औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शुक्रवार दिनांक २७/७/९० रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री.ईश्वर भोसीकर | सभापती/औ.मं |
| श्री.अ. म.महाजन | उपसभापती/औ.मं |
| श्री.द.मो.गोडघाटे<br>उपसंचालक नगररचना<br>औरंगाबाद विभाग | सदस्य |
| श्री.जंबगी<br>कार्यकारी अभियंता<br>म.न.पा.औरंगाबाद | सदस्य प्रतिनिधी |

विभागीय आयुक्त औरंगाबाद/नासिक व प्रशासक म.न.पा नासिक हे पूर्व सूचनेनुसार अनुपस्थित होते.

विषय क्र.१: दिनांक २८/६/९० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या दिनांक २८/६/९० रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीत विषय क्र.३ वर चर्चा होऊन ठराव क्र.२७८ अन्वये असा निर्णय घेण्यांत आला होता की, श्री.बावीस्कर यांना मंडळासमोर बोलवावे व त्याचे गाळा क्र.७८७ घेण्याबाबत काय म्हणणे आहे ते ऐकुन घ्यावे व नंतरच पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घ्यावा.त्यानुसार श्री.बावीस्कर यांना मंडळाच्या ५२ व्या बैठकीसमोर हजर राहण्यासाठी पत्र पाठविले होते. परंतु श्री.बावीस्कर मंडळासमोर हजर राहिले नाही सबब गाळा वाटपासाठी निर्णय घेता आला नाही.

. . . .

तसेच मंडळाच्या दिनांक २८.६.९० रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीत विषय क्र.५ व ठराव क्र.२८० वर चर्चा करतांना मंडळाने असे आदेश दिलेत की, मनमाड येथील वसाहतीत शाळेसाठी आरक्षीत असलेल्या भूखंडासाठी जाहिरात देऊन शासन मान्य शिक्षण संस्थेकडून अर्ज मागवावेत.

. . .२

ठराव क्र. २८३

दिनांक २८/६/९० रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: धुळे येथील भूसंपादनाबाबत ६०:४० टक्के तत्वावर वाटाघाटीबाबत.

ठराव क्र. २८४

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळास धुळे येथील गृहनिर्माणाची गरज लक्षात घेता जमिन लवकर ताब्यात मिळणे आवश्यक आहे. इतर ठिकाणी तसेच धुळे शहरासाठी अगदी लगतच्या जमिनी शासनाचे ६०:४० टक्के धोरणानुसार संपादीत केल्या आहेत. तरी खालील जमिनी न्याय प्रविष्ट प्रकरणामुळे ताब्यात मिळण्यास लागणा-या दिर्घ कालावधीचा विचार करता शासनाचे सुचनेप्रमाणे जमिन मालकास ४०% ,१.८८ हे जमिन सोडून, मंडळास ६०%, २.८१८ हे. जमिन उपलब्ध होऊ शकेल. त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मंडळाने मान्यता दिली.

| स. क्र. | क्षेत्र १००% हे. आर. | क्षेत्र ६०% हे. आर |
| --- | --- | --- |
| ४६७/२ | १.०९ | ०.६५४ |
| ४६८ | ०.४२ | ०.२५२ |
| ४६९ | १.७२ | १.०३२ |
| ४७० | १.४७ | ०.८८२ |
| | ४.७० | २.८१८ हे. |

विषय क्र. ३: औरंगाबाद मंडळाच्या जाहिराती वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यासाठी वृत्तपत्रानी जाहिरात दरात केलेल्या वाढीस मान्यता मिळणेबाबत.

---

ठराव क्र. २८५

---

या बाब टिप्पणीवर सखोल चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की, औरंगाबाद येथील स्थानिक दैनिक लोकमत व मराठवाडा या वृत्तपत्रांनी कागदाच्या व छपाईच्या दरात झालेल्या वाढीमुळे वृत्तपत्राच्या जाहिरात दरात सुधारणा करुन त्यात वाढ केली आहे व सदर वाढीव दराप्रमाणे देयके अदा करण्यास मंडळाने मान्यता दिली आहे. परंतु ११% डिस्काऊंट सदर वृत्तपत्रांनी आतापावेतो दिला आहे तो प्रत्येक बिलातून **घेण्यात यावा**

विषय क्र. ४: औरंगाबाद गृहनिर्माण मंडळातील गाळेधारकांनी अनाधिकृत केलेले बांधकाम तोडण्याबाबत.

---

मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी रामनगर, जालना येथील वसाहतीत गाळेधारकांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत व जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनात झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे काय कार्यवाही केली याबाबत विचारणा केली. याबाबत कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालु आहे.

तसेच रामनगर, जालना येथील मंडळाच्या वसाहतीत गाळेधारकांनी मंडळाच्या मोकळया जागेवर अतिक्रमण केलेले आहे व हो अतिक्रमणे गेल्या एकदीड वर्षापासून चालु आहे व त्यावर मंडळाकडून कसल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्याने सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. सदरची अतिक्रमणे गटारे व ड्रेनेज लाईनवर असल्यामुळे सांडपाणी व मलनि:सारणाचा व्यवस्थीत निचरा होत नाही त्यामुळे दुर्गंधी पसरते त्यातल्या त्यात पावसाळ्यात दा त्रास मोठया प्रमाणात जाणवतो यासाठी ज्या लोकांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहे अशा सर्व

..४

प्रकरणांची माहिती गोळा करुन मंडळाच्या पुढील बैठकीसमोर विस्तृत टिप्पणीसह ठेवावी म्हणजे अनाधिकृत बांधकामास कशा प्रकारे आळा बसेल त्यासंबंधी विचार विनिमय करता येईल.

या विषयावर सविस्तर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना सांगितले की, मंडळाच्या वेगवेगळया ठिकाणी वसाहती आहे. सदर वसाहतीत गाळेधारकांनी मंडळाच्या जागेवर व ड्रेनेज लाईनवर व गटारे इत्यादीवर अनाधिकृत बांधकामे केलेली आहे. त्यामुळे सांडपाणी व मलनि:स्सारण व्यवस्थेत बिघाड होऊन गाळेधारकांना त्रास होतो यासाठी अनाधिकृत बांधकामे पाडण्यासाठी मिळकत व्यवस्थापकांना अधिकार द्यावेत. तसेच बांधकाम तोडावयाच्या दिवशी पोलीस बंदोबस्त ठेवावा. त्यासाठी पोलीस खात्याकडे पैसे भरुन पोलीस कुमक तयार ठेवावी लागेल. तसेच बांधकाम पाडण्यास रोजंदारीने मजूर लावावे लागतील हयासाठी होणा-या खर्चास मंडळाने मान्यता द्यावी असे उपसभापतींनी सांगितले.

ठराव क्र. २८६ :

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने अनाधिकृत बांधकामे पाडण्यासाठी मिळकत व्यवस्थापक यांना अधिकार प्रदान करण्यास मंजूरी दिली व अनाधिकृत बांधकाम पाडण्याच्या वेळी पोलीस कुमक ठेवावी लागेल त्याकरिता येणारा खर्च व रोजंदारी मजूरांना द्यावी लागणारी रोजंदारी यासाठी होणा-या खर्चास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ५: विशेष नियोजन प्राधिकरण-वाळूज
मंडळाने ताब्यात घेतलेल्या शासकीय जमिनीवरील व लगतच्या खाजगी जमिनीवर असलेले स्टोन क्रेशर्स हलविण्याबाबत.

ठराव क्र. २८७

वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात मौजे तीसगांव येथील गट नंबर १०४/१ व गोलवाडी येथील गट नं. ७९ या शासकीय जमिनी

मंडळास हस्तांतरीत झालेल्या आहेत. परंतु एकुण २१.९२ हे. जमिनीपैकी १५.२५ हे. मोकळया जमिनीचा ताबा मंडळास प्राप्त झालेला आहे व उर्वरीत ६.६७ हे. जमिनीचा ताबा सदर जागेवर स्टोन क्रेशर्स असल्यामुळे मिळू शकलेला नाही. सदर स्टोन क्रेशर्स त्वरीत हलवून मंडळास जागा ताब्यांत यावी म्हणून मंडळाने वेळोवेळी विनंती केलेली आहे. स्टोन क्रेशर्स मालकांना पर्यायी जागा देण्यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी मौजे तीसगांव येथील शासकीय गट नं.२२७/१ व २२५/१ हया ना विकास विभागात समाविष्ट करण्यांत आलेल्या जमिनीवर स्टोन क्रेशर्स काही काळासाठी चालविण्याकरिता ना हरकत देण्यास मंडळास विनंती केली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास पाठवावा असे ठरले.

विषय क्र.६:- औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाने महावीर स्तंभाजवळ देवगिरी कॉलेजजवळ, सिडको एन-६ व गारखेडा येथे बांधलेल्या विविध गटातील गाळयांच्या पाणीपुरवठयाबाबत.

उपसभापतींनी अशी माहिती दिली की, हा विषय आयुक्त म.न.पा. यांच्याशी संबंधीत आहे व आयुक्त हे बैठकस हजर नसल्याने हा विषय पुढील बैठकीत ठेवावा.

ठराव क्र. २८८

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की, सदर विषय पुढील बैठकीत ठेवावा.

विषय क्र.७: एकनाथनगर औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटा अंतर्गत १० गाळे व ४ दुकाने समाविष्ट असलेल्या इमारतींच्या बांधकामाबाबत.

ठराव क्र. २८९

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सध्या एकनाथनगर येथे ज्या ठिकाणी १० गाळे उच्च उत्पन्न गट व ४ दुकाने प्रस्तावीत आहेत त्याच ठिकाणी इमारतीचे बांधकाम करावे व त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न मंडळाच्या कार्यकारी अभियंता आणि इतर अधिका-यांनी करावे.

विषय क्र.८: मा.सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय.

विषय क्र.१: जळगांव येथील खाजगी जमिन संपादनाबाबत.

उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना अशी माहिती दिली की, जळगांव येथे गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी १९८१ ते १९८४ च्या दरम्यान एकुण ८८.८० हे. जमिन संपादनास्तव प्रस्तावीत केली, परंतु संबंधीत जमिन मालकांनी या संपादनाविरुध्द उच्च न्यायालयातून स्थगिती मिळविली. न्यायालयीन स्थगितीमुळे बाधीत झालेल्या जमिनी उपलब्ध व्हाव्यात म्हणून शासनाने स्विकारलेल्या ६०:४० टक्के धोरणानुसार मा. आयुक्त, नासिक यांनी संबंधीत जमिन मालकांशी विचारविनिमय करण्याकरिता एक सभा दि.९.९.८८ रोजी बोलाविली होती. या सभेमध्ये विभागीय आयुक्तांनी जमिन मालकांना ६०% जमिन देण्याचे आव्हान केले. त्यासाठी सरसकट रु. ५ प्रति चौ.फुट दर दिला जाईल असे सांगितले या सभेमध्ये श्री. वाणी उपस्थित होते. परंतु कुणीही जमिन देण्याबाबत सहमती दर्शविली नाही व विचार करण्याकरिता एक महिन्याची मुदत मागितली. त्यानंतर श्री. वाणी यांनी ६०% जमिन देण्याची इच्छा दर्शविली त्याप्रमाणे विभागीय आयुक्त नासिक यांच्या कार्यालयात एक सभा घेतली असता श्री. वाणी यांनी बाजारभावाने मोबदला द्यावा असा आग्रह धरला त्यामुळे वाटाघाटी फिसकटल्या. प्राधिकरणाने देखील रु. ५ चौ.फुट हया विभागीय आयुक्तांनी सुचविलेल्या दरास अनुमती दिली नाही. त्यामुळे जमिन संपादनाबाबत पुढील प्रगती होऊ शकली नाही.

आता दिनांक २३.७.९० रोजी मा. सभापती यांना गट क्र. ५६ चे मालक मयत श्री. बळीराम मनोहर वाणी यांचे वारस श्रीमती देवकाबाई वाणी व अन्य पाच जण यांनी पत्र देऊन संपादनाविरुध्द त्यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रकरण तडजोडीने मिटविण्याचा प्रस्ताव दिला अशी उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली.

. . .७

यापुढे असेही सांगितले की, भांबोरी, जळगांव येथील अंदाजे ७४ हे. शासकीय जमिन मंडळास देण्याचे जिल्हाधिकारी जळगांव यांनी तयारी दर्शविली होती. परंतु दिनांक २२.७.९० रोजी मा. नामदार श्री. अरुण गुजराथी, राज्यमंत्री नगरविकास यांनी सदर जमिन प्रस्तावीत जळगांव विद्यापीठासाठी देण्याचे ठरले असल्याने मंडळास उपलब्ध होऊ शकणार नाही असे सांगितले.

यावर मा. सभापती व सदस्यांनी सांगितले की, जळगांव येथे गृहनिर्माणाची तीव्र निकड भासत असल्याने व मंडळाकडे जमिन उपलब्ध नसल्याने व पुढेही जमिन उपलब्ध होण्याची शक्यता फारच कमी आहे करिता श्री. बळीराम मनोहर वाणी यांच्या वारस श्रीमती देवकाबाई वाणी व अन्य ५ जण यांनी ५०% जमिन देण्याचा दिलेला प्रस्ताव स्विकारावा व प्रस्ताव प्राधिकरणास पुढील कार्यवाहीस्तव पाठवावा.

ठराव क्र. २९०

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की, गट क्र. ५६ पिंप्राळे जळगांव येथील मालक श्री. बळीराम मनोहर वाणी यांच्या वारस श्रीमती देवकाबाई वाणी व अन्य पाच जण यांनी दिनांक २३.७.९० रोजी दिलेला प्रस्ताव स्विकारुन न्यायालयीन स्थगितीमुळे बाधीत असलेली ८ एकर २८ गुंठे जमिनीपैकी ५०% म्हणजे ४ एकर १४ गुंठे जमिन मंडळाने घ्यावी व ४ एकर १४ गुंठे जमिन, जमिन मालकास सोडावी, मंडळास सोडलेल्या ५०% जमिनीचा मोबदला म्हाडा अॅक्ट कलम ४४ नुसार जो ठरेल त्याप्रमाणे देण्यांत यावा.

विषय क्र. २: महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास [मिळकत व्यवस्थापन, गाळ्याची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल] विनियम १९८१ च्या विनियम क्रमांक २ [१] [ब] मधील तरतुदीनुसार वाटप समिती स्थापन करणेबाबत.

ठराव क्र. २९१

मंडळाने या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतला की, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील गाळे/भूखंडाच्या वाटपासाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास [मिळकत व्यवस्थापन, गाळ्याची विक्री हस्तांतरण व अदलाबदल] विनियम क्र. २ [१] [ब] नुसार वाटप समितीवर खालील प्रमाणे सभासदाची नेमणूक करण्यास मंडळाने मान्यता दिली.

१] मंडळाच्या कार्यालयातील उपअभियंता,

२] जिल्हाधिका-यांनी नियुक्त केलेला उपजिल्हाधिकारी,

३] जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी,

४] मंडळाचे मिळकत व्यवस्थापक,

५] मंडळाचे कार्यकारी अभियता.

ही समिती गाळे /भूखंड वाटपाचे काम पार पाडेल.

बैठक संपल्यानंतर मा. सभापती यांनी सदस्यांचे व सदस्यांनी सभापतीचे आभार मानले.